शैक्षणिक वर्ष २०१९-२० -गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७४/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.४ ऑक्टोबर,२०१८
२) शासन शुध्दिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.३० ऑक्टोबर,२०१८
३) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्रमांक १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/ २०१८/२०७,दिनांक ११ सप्टेंबर,२०१९

प्रस्तावना :-

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ अन्वये परदेशातील THE/QS Ranking 200 च्या आत असलेल्या विद्यापीठामध्ये पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका तसेच पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता “गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” ही योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता या योजनेच्या अनुषंगाने ऑन-लाईन अर्ज मागविण्याकरीता दिनांक २२ जून, २०१९ रोजी तंत्र शिक्षण संचालनालयाने जाहिरात प्रसिध्द केली होती. ऑन-लाईन अर्ज दाखल करण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट,२०१८ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती.

२. विभागीय कार्यालयांनी अंतिम मुदतीपर्यंत प्राप्त संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करुन निश्चित केलेले एकूण ६० अर्ज तंत्र शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त झाले होते. प्राप्त अर्जांपैकी संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीने ३९ अर्ज परदेशी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरविले आहेत. त्यानुसार छाननी समितीने पीएचडी अभ्यासक्रमासाठी ०१ उमेदवाराची व पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमासाठी ३८ उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी तयार केली आहे.

३. दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे परदेशी शिष्यवृत्तीची अंतिम निवड करण्याकरीता निवड यादी तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत निवड समितीने पीएचडी अभ्यासक्रमासाठी ०१ तर पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी १२

अशा रितीने एकूण १३ उमेदवारांची परदेशी शिष्यवृत्तीकरीता शिफारस केली आहे. संचालक, तंत्र शिक्षण यांनी वर नमूद दिनांक ११ सप्टेंबर,२०१९ च्या पत्राव्दारे, निवड समितीच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता परदेशी शिष्यवृत्तीसाठी शासनाची मान्यता प्राप्त करुन घेण्याकरीता प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यास अनुसरुन या योजनेखाली शिष्यवृत्ती मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

अ)**पीएचडी अभ्यासक्रम :-**

अ. क्र.	शाखा	उपलब्ध जागा	उमेदवाराचे नाव	प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव
१	कला	१	सचिन मोहन मोहिते	PhD in education	University of New York

आ) पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम:-

अ.क्र.	शाखा	उपलब्ध जागा (समांतर आंतर परिवर्तना नंतर)	उमेदवाराचे नांव	प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नांव
१	कला	०१	श्री. अभिनव अविनाशराव जोशी	Master of Public Admini-stration	Colombia University, The City of New York, United State of America
२	व्यवस्थापन	०२	१) श्रीम. गुंजन राजेंद्र पाटील	M.S. in Enterpreneurship	University College, London, United Kingdom
			२) श्री. कपिलदेव सुरेशभाई पाटील	Master of Public Policy	London School of Economics, United Kingdom
३	विधी अभ्यासक्रम	०२	श्रीम. ज्ञानेश्वरी दयानंद चिंचोलीकर	Master of Law in international Legal Studies	New York University United State of America
४	अभियांत्रिकी/ वास्तुकला शास्त्र	०८	१) श्री. ललित जयनारायण घुले	Master of Science in Mechanical Engg. Research	Carnegie Mellon University, United State of America

			२) श्री. चैतन्य शरदचंद्र पाटील	Master of Science in Electrical & Computer Engg.	University of California, San Diego, United State of America
			३) श्री. दिग्विजय दिलीप माळी	Master of Science in Computer Science	University of Southern California, United State of America
			४) श्री. प्रभाकर मनोज नाईक	Master of Science in Mechanical Engg.	Colombia University, The City of New York, United State of America
			५) श्रीम. अक्षदा मोहन मुळे	Master in Architecture -II	University of California, Los Angeles, United State of America
			६) श्री. ओंकार किशोर औटी	Master of Engineering (Mechanical with Business)	University of Melbourne, Australia
			७) श्री. पारस नंदकुमार भावार्थी	Master of Science in Software Engg	Carnegie Mellon University, United State of America
			८) श्रीम. संपदा संदीप आचार्य	Master of Science in Mechanical Engg. Research	Carnegie Mellon University, United State of America

२. वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

१) सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांचे पालन होणे आवश्यक आहे.

२) ही शिष्यवृत्ती गृह चौकशीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आली आहे. गृह चौकशीमध्ये विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज दाखल करताना सादर केलेली माहिती चूकीची असल्याचे आढळल्यास ही शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

३) कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा शासनाने निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्तव्यात कसूर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५ टक्के चक्रवाढ व्याजाने

वसूली करण्यात येईल, अशा विद्यार्थ्याचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामिनदार आणि संदर्भअधिकारी / व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

४) ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्याने राज्यात परत येऊन त्याच्या अभ्यासक्रमाचा लाभ राज्यास होईल याकरीता आवश्यकतेनुसार राज्य शासनास सेवा देणे अपेक्षित आहे. त्याबाबतचे बंधपत्र विद्यार्थ्याने देणे आवश्यक राहिल.

५) ही शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या विद्यार्थ्याने दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याबाबतचे बंधपत्र / हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये या योजनेकरीता शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्तीच्या रकमेची अचूक परिगणना करण्याची जबाबदारी तंत्र शिक्षण संचालनालयाची असेल. संचालनालयाने दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन शिष्यवृत्तीच्या रकमेची परिगणना करावयाची आहे. शासन आदेशात नमूद कोणत्याही अटी/शर्तीची पूर्तता होत नसल्यास ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येऊ नये. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना वितरीत करण्यापूर्वी प्रशासकीय विभागाकडून मंजूरी प्राप्त करुन घेण्यात यावी.

४. या शिष्यवृत्तीसाठी होणारा खर्च “मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३ तंत्रशिक्षण-१०७ शिष्यवृत्त्या (००)(०१) गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे (२२०३ ३५५१) (कार्यक्रम)” या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्ष २०१९-२०२० मधील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९१८१५३२४३०४०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.09.19 11:28:37 +05'30'

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
१. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव

५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१०. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२०. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२८. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३१. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३२. निवडनस्ती/तांशि-४